# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of illegal Gutkha**

**Police Station** :- **SDPO Karanja**

**Date of Good Work done** :- **05/11/2022**

**Brief of the work done :-**

पोलिसांच्या छापेमारीत 12 लाखांचा गुटखा जप्त ; 06 आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल.

## पोलिसांच्या छापेमारीत बारा लाखांचा गुटखा पकडला

### एसडिपीओ पथकाची कारवाई; सहा जणांविरूध्द गुन्हा दाखल

मानोरा, दि. ४ (प्रतिनिधी)

**शहर तसेच तालुक्यात अवैध गुटखा विक्री सुरु असल्याच्या माहितीवरुन उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या पथकाने ३ नोव्हेंबरच्या रात्री छापेमारी केली. या कारवाईत सुमारे १२ लाख १४ हजार ८३९ रुपयांचा गुटखासाठा जप्त करुन सहा जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे गुटखा माफियांचे धाबे दणाणले आहेत.**



जिल्ह्यात अवैधरित्या गुटखा विक्री करणाऱ्यांना पायबंध घालण्याकरिता जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांच्या आदेशाने विशेष मोहीम राबविण्यात आली. त्या अनुषंगाने ३ नोव्हेंबर रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, कारंजा व पो.स्टे.मानोरा यांच्या संयुक्त पथकाने छापेमारी केली. या कारवाईत मानोरा पोलीस स्टेशनच्या हद्दीत १२ लाख १४ हजार ८३९ रुपयांचा गुटखासाठा जप्त करण्यात आला. मानोरा शहरातील अपना स्वीट मार्ट येथील छाप्यात ०२ आरोपींसह अंदाजे ४ लाख ३७ हजार ७२१, संगम किराणा गोडाऊन येथील छाप्यात ०१ आरोपीसह अंदाजे १ लाख ४० हजार ७३२, दातीर किराणा गोडाऊन येथील छाप्यात ०१ आरोपीसह अंदाजे ४ लाख २१ हजार ५८०, व्यंकटेश स्वीट मार्ट येथील छाप्यात ०१ आरोपीसह अंदाजे १ लाख ९८ हजार ३५६ व सोमनाथ टीन पत्र्याचे दुकान येथील छाप्यात ०१ आरोपीसह अंदाजे १६ हजार ४५०रुपयांचा मुद्देमाल असे एकूण ०५ आरोपींसह अंदाजे रुपये १२ लाख १४ हजार ८३९/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला गेला. याप्रकरणी पोलीस नायक सुनील सुभाष चव्हाण यांच्या तक्रारीवरुन आरिफ अकबानी,बिलाल आरिफ अकबानी, मो.सरफराज आरिफ डबेवाला,अजीस अहमद पोपटे, मनोज छालीवाल, गोविंद भगवानदास हेडा यांचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील कायदेशीर कारवाई सुरु आहे. सदर कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह, अपर पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांच्या आदेशाने उपविगागीय पोलीस अधिकारी जगदीश पांडे, पोलीस निरीक्षक ब्रम्हदेव शेळके, उपनिरीक्षक सवित्ता वड्डे, उपनिरीक्षक रामेश्वर नागरे, विनोद सोनोने, मयुरेश तिवारी, बालाजी महल्ले, बन्शी चव्हाण, देवधर वाळके, अमित वानखडे, संतोष चव्हाण, विद्या राऊत यांच्या पथकाने केली.

#### दोन आरोपी फरार

उपविभागीय पोलीस अधिकारी जगदीश पांडे यांनी गुरुवारी रात्री सुरु केलेले धाडसत्र शुक्रवारी सकाळपर्यंत सुरु होते. यामध्ये वेगवेगळ्या दुकानातुन प्रतिबंधित गुटखा साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणी एकुन सहा आरोपी विरूध्द गुन्हा दाखल केला. यापैकी चार आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून दोघे फरार असल्याची माहिती आहे.

#### गुटख्याचा विस्तार उजागर

शहरात गुटका व्यवसाय तेजीत असल्याची चुणुक उपविभागीय पोलीस अधिकारी यांना लागताच धाड सत्र टाकण्यात आले. वेगळ्या नावाचे फलक लावले असलेल्या बंद शटरमध्ये लाखो रूपयाचा गुटका मिळाला. या कारवाईमुळे शहरातील प्रतिबंधित गुटख्या व्यवसायाचा विस्तार उघड झाल्याची चर्चा आहे.